# प्रेसनोट दि. १२/१२/२०२४

१९ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२४ चा समारोप समारंभ दि. १२/१२/२०२४ रोजी १६.३० वाजता राज्य राखीव पोलीस दल, गट क्र. २, पुणे येथील परेड मैदानावर प्रमुख पाहुणे श्री रश्मि शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे उपस्थितीत संपन्न झाला. समारोप समारंभात बँड पथकाद्वारे प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देण्यात आली. श्री प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., पुणे यांनी प्रमुख पाहुणे यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. स्पर्धेत सहभागी २५ संघांनी शिस्तबद्ध संचलन करुन प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली तसेच त्यांना मेळावा व स्पर्धेविषयी माहिती दिली तसेच पोलीस श्वानांनी रोमांचक प्रात्यक्षिके सादर केली.

प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सर्व स्पर्धांमधील उत्कृष्ट संघांना खालीलप्रमाणे फिरते चषक प्रदान करण्यात आले आहेत.

**बेस्ट टीम परफॉर्मन्स ट्रॉफी**

१. सायंटीफीक एड टू इन्व्हेस्टीगेशन - ए.टी.एस.
२. पोलीस फोटोग्राफी - कोल्हापुर परिक्षेत्र
३. पोलीस व्हिडीओग्राफी - एस.आर.पी.एफ. परिक्षेत्र
४. संगणक सजगता - कोल्हापुर परिक्षेत्र
५. श्वान स्पर्धा - कोल्हापुर परिक्षेत्र
६. घातपात विरोधी तपासणी - फोर्स वन मुंबई
७. कै. अशोक कामटे फिरता चषक - फोर्स वन मुंबई

**सीसीटीएनएस बेस्ट घटक परफॉर्मन्स ट्रॉफी**

१) मुंबई पूर्व विभाग
२) नाशिक ग्रामीण
३) रायगड

**मेळाव्यातील सर्वोत्कृष्ट तथा सर्वसाधारण विजेता संघ - नागपूर शहर**
**मेळाव्यातील सर्वसाधारण उप विजेता संघ - कोल्हापुर परिक्षेत्र**
**गुन्हे अन्वेषण विभागाचा शताब्दी फिरता चषक विजेता संघ - नागपूर शहर**

प्रमुख पाहुणे आदरनिय श्रीमती. रश्मि शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन केले. आपल्या भाषणात स्पर्धकांना मार्गदर्शन करुन नवीन विज्ञान व तंत्रज्ञान बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पोलीसांच्या कर्तव्याबाबतचे महत्व अधोरेखित केले. नव्याने येवू घातलेल्या कायद्यांच्या बदलांच्या पाश्वभूमीवर पोलीसांना शास्त्रीय साधनांचा उपयोग करणे अनिवार्य असणार आहे त्यामुळे तपासी अंमलदारांनी तपासादरम्यान वैज्ञानिक दृष्टीकोन अंगी बाळगणे गरजेचे आहे यावर माननियांनी भर दिला. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. अगामी ६८ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्र संघास उत्कृष्ट कामगिरी करण्याकरिता शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमास,

१. श्री कृष्णन, सेवानिवृत्त, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
२. श्री, दत्ता पडसलगीकर, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
३. श्री विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.
४. श्री प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
५. श्री दिपक पांडे, अपर पोलीस महासंचालक, संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, म.राज्य, पुणे,
६. श्री सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र.
७. श्री अशोक मोराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, परिक्षेत्र पुणे,
८. श्री राजेंद्र डहाळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, एम.आय.अे., पुणे,
९. श्री. जालिंदर सुपेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक, सुधारगृह, पुणे
१०. श्री. सारंग आवाड, पोलीस उप महानिरीक्षक, प्रशासन, गु.अ.वि., पुणे
११. श्री. डॉ. बसवराज तेली, पोलीस उप महानिरीक्षक, आगुशा, गु.अ.वि., पुणे
१२. श्रीमती आंचल दलाल, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १, पुणे
१३. श्रीमती नम्रता पाटील, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. २, पुणे
१४. श्री. पी. आर. पाटील, पोलीस अधिक्षक, आगुशा. गु.अ.वि., पुणे.
१५. श्रीमती पल्लवी बर्गे पोलीस अधिक्षक, का.व सं., गु.अ.वि., पुणे व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

त्याच प्रमाणे सदर सांगता समारंभास पोलीस कुटुंबीय तसेच प्रिन्ट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधी हजर होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. सारंग आवाड, पोलीस उप महानिरीक्षक, प्रशासन, गु.अ.वि., पुणे यांनी केले तसेच सुत्रसंचलन श्रीमती अर्चना कदम, पोलीस निरीक्षक, गु.अ.वि., पुणे शहर व श्री सचिन देवडे, पोलीस नाईक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ यांनी केले. संपुर्ण महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळावा २०२४ च्या आयोजनात मा. पोलीस अधीक्षक (कायदा व सुव्यवस्था) श्रीमती. पल्लवी बर्गे यांनी मोलाची कामगिरी पार पाडली.